स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील

पीएच. डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या

शोधप्रबंधाचा आराखडा

वाशिम जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात स्वयं-सहाय्यता बचत गटांची भूमिका : (विशेष संदर्भ 1 एप्रिल 2010 ते 31 मार्च 2020)

संशोधक

ओमप्रकाश शिवाजीराव जाधव

मार्गदर्शक

डॉ. पाटील पी. आर.

संशोधन मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,

श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय, बसमत, जि.हिंगोली

सप्टेंबर - 2023

वाशिम जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात स्वयं-सहाय्यता बचत गटांची भूमिका (विशेष संदर्भ 1 एप्रिल 2010 ते 31 मार्च 2020)

प्रस्तावना (introduction) :

अलिकडील काळात सुक्ष्म वित्तचा विस्तार होतांना दिसत आहे. समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बळ प्रगतीचे माध्यम म्हणून सुक्ष्म वित्ताकडे पाहिले जाते. भारतासारख्या विकसनशील देशात सातत्याने वाढणाऱ्या लोकसंख्येबरोबरच देशाला बेरोजगारी, दारिद्र्य व उपासमार अशा दृष्टचक्राचा सामना करावा लागत आहे. भारतामध्ये दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. अशा या दारिद्र्यात जीवन जगत असलेल्या लोकांना या दृष्टचक्रातून बाहेर काढणारे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे आर्थिक सबलीकरण करणारे आणि महिलांचे आर्थिक स्वावलंबन करणारे अतिशय महत्त्वाचे साधन म्हणून सूक्ष्म वित्तातील ‘स्वयं सहाय्यता बचत गट’ पुढे आलेले आहे. स्वयं सहाय्यता बचत गटांमुळे महिलांच्या आर्थिक विकासासोबतच त्यांचे सामाजिक, प्रतिष्ठा उंचावण्यास मदत होत आहे.

जागतिक पातळीवर सर्वप्रथम बांग्लादेशातील अर्थतज्ज्ञ डॉ. महमंद युनूस यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची सावकारी त्रासातून मुक्तता व्हावी व या लोकांना स्वयंरोजगाराचे कायमचे साधन प्राप्त व्हावे या उद्देशाने या लोकांना एकत्रित करून त्यांचे छोटे-छोटे गट तयार करून त्यांना लघु स्वरूपाचे व्यवसायिक कर्ज दिले. याच कार्यातून डॉ. महमंद युनूस यांनी बांग्लादेशात स्वयंसहाय्यता बचत गटाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या या कार्याची दखल संयुक्त राष्ट्रसंघ आणि जागतिक बँक यासारख्या जागतिक संस्थांनी घेतली. महमंद युनूस यांनी ‘थेंब-थेंब तळे साचे’ या म्हणी प्रमाणे बांग्लादेशातील गरिब कुटुंबातील महिलांना बचत गटाच्या माध्यमातून एकत्र आणून पैसे बचत करण्यास प्रोत्साहित केले आणि ग्रामीण बँकेच्या

माध्यमातून त्या देशातील गरिबी दूर करण्याचा यशस्वी प्रयोग केला. त्यांनी महिलांसाठी केलेल्या या कार्यामुळे महिलांमध्ये आर्थिक उन्नती सोबतच सकारात्मक बदल घडून आला. तसेच त्यांना एक नवी दिशा मिळाली व स्वयंरोजगारांच्या माध्यमातून त्या खऱ्या अर्थाने उभ्या राहिल्या. म्हणून हे प्रतिमान जगभरात प्रसिद्ध झाले.

भारतामध्ये महिला स्वयं सहाय्यता बचत गटाची सुरूवात 1990 साली राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) ची योजना एस.एच. जी. बँक लिंकेन प्रोग्रामच्या माध्यमातून झाली. आज देशात असंख्य बचत गट स्थापन झालेले आहेत. त्यामध्ये महिला बचत गटाची संख्य 1 लाख 642 आहे. तसेच महाराष्ट्र कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश व बिहार सारख्या राज्यात मोठ्या प्रमाणात महिला स्वयं सहाय्यता बचतगट फोफावतांना दिसत आहेत. महाराष्ट्रात 1992 मध्ये प्रायोगिक तत्त्वावर चार जिल्ह्यात स्वयं सहाय्यता गटाची निर्मिती केली. परंतु खऱ्या अर्थाने इ.स. 1947 मध्ये अमरावती जिल्ह्यातील काही सासू-सुनांनी एकत्र येऊन पंचवीस पैसे बचतीचे गट निर्माण केल्याचे दिसून येते. मात्र आज हे स्वयं सहाय्यता महिला बचतगट महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात तसेच गावपातळीवरील जोमाने भरभराटीस येताना दिसत आहेत.

महिला स्वयं सहाय्यता बचत गटाचे मुख्य उद्दिष्टे महिलांमधील जे सुप्त गुण आहेत त्यांचा विकास करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आहे. आज देशात एकूण लोकसंख्येच्या सरासरी 50 टक्के महिला असतांनाही त्या विकासाच्या प्रक्रियेत सक्रिय झालेल्या दिसत नव्हत्या. वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरा, रूढी, चालीरिती यांच्या बंधनात अडकून राहिल्याने त्यांना विकासामध्ये महत्त्व दिले गेले नाही आणि त्यांना विकासाची संधी सुद्धा मिळाली नाही. परंतु वास्तविकता ही आहे की, जोपर्यंत महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहाता आणले जात नाही. तोपर्यंत भारताच्या महासत्तेची कल्पना करणे योग्य होणार नाही. ह्या करिता स्वयं सहाय्यता बचतगट महिलांच्या विकासाकरिता प्रभावी माध्यम म्हणून समोर येत आहे. अलिकडील विकासाकरिता प्रभावी माध्यम म्हणून समोर येत आहे. अलिकडील काळात देशात महिला बचत

गटांच्या झालेल्या विस्तारामुळे व त्यामध्ये झालेल्या प्रशंसानीय प्रगतीमुळे महिला विकास प्रक्रियेत पुरूषांच्या खाद्याला खांदा लावून त्या विविध आघाड्यावर काम करत आहेत. ही बाब लक्षात घेऊनच 'वाशीम जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात स्वयं सहाय्यता बचत गटाची भूमिका' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of research) :

महाराष्ट्रात 1992 मध्ये महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची निर्मिती झाली व त्याचे अपेक्षित परिणाम सध्या दिसत आहेत. स्वयंसहाय्यता बचत गटांमुळे ग्रामीण भागात निर्माण होणारी बचत आणि कर्जपुरवठा यामुळे महिलांना प्राप्त झालेल्या स्वयंरोजगाराच्या संधी, त्यांच्या व कुटुंबियांच्या राहणीमानात झालेल्या सुधारणा, महिलामध्ये घडून आलेले सकारात्मक बदल आणि महिलांचा सामाजिक कार्यातील वाढता सहभाग इत्यादीमुळे महिलांचे सबलीकरण होवून त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाला वाव मिळत असल्याचे दिसून येते.

स्वयं सहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून गावातील खेड्यापाड्यातील, वाडीवस्तीतील महिलांच्या आर्थिक व स्वावलंबनाबरोबरच गटातील महिलांमध्ये अडी-अडचणी, सुख-दुख:शी एकरूप होऊन त्यातून मार्ग शोधण्याचे सामर्थ्य आलेले आहे.

भारतातील विविध राज्ये व विभागामध्ये त्या-त्या प्रदेशातील नैसर्गिक, औद्योगिक, शैक्षणिक, राजकीय घटकांच्या परिणांमुळे त्या-त्या ठिकाणी महिला स्वयंसहाय्यता बचत गटांचे भिन्न-भिन्न परिणाम घडून आलेले आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य विदर्भ विभागातील वाशीम हा जिल्हा अपुरे औद्योगिकरण, जलसिंचनाच्या पर्याप्त सुविधांच्या अनुउपलब्धतेमुळे कृषीवरती अवलंबित्व, दरडोई उत्पन्न कमी, साक्षरतेचे प्रमाण कमी विशेषत: स्त्री साक्षरतेचे प्रमाण फारच कमी, तंत्र शिक्षणाच्या सुविधांची कमतरता, व्यवसायिक कुशलतेचा अभाव, सहकारी संस्था क्षीण, स्वयं सेवी संस्थांचा अभाव इत्यादी कारणांमुळे हा जिल्हा मागासलेला

आहे म्हणून या जिल्ह्यातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासात महिला स्वयं सहाय्यता बचत गट काही बदल घडवून आणू शकतो काय? महिला मधील आरोग्य विषयी जाणीव, स्वयं रोजगार, समुह प्रेरणा, समूह शक्ती, राजकीय जागृती, शिक्षण, नेतृत्वाची संधी, आत्मसन्मानाची भावना वाढीस लावण्यास बचत गटत कितपत मदत करतो आहे. याचा शोध घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :

प्रस्तुत संशोधनात संशोधकांनी पुढील हेतु व उद्दिष्टे डोळयासमोर ठेवले आहेत.

1. वाशीम जिल्ह्यातील महिला स्वयं सहाय्यता बचत गटाचे अध्ययन करणे.
2. वाशीम जिल्ह्यातील स्वयं सहाय्यता महिला बचत गटात सहभागी महिलांच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.
3. वाशीम जिल्ह्यातील स्वयं सहाय्यता बचत गटाचे महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासातील योगदान अभ्यासणे.
4. वाशीम जिल्ह्यातील महिला स्वयं सहाय्यता बचत गटातील महिलांसमोर असणाऱ्या समस्यांचा अभ्यास करून उपाय योजना सुचविणे.

गृहितके (Hypothesis) :

सामाजिक संशोधनामध्ये गृहितकृत्यांचे विशेष महत्त्व आहे. गृहितकृत्ये हे संशोधनात दिवसाप्रमाणे मार्गदर्शन करतात. संशोधनात वैज्ञानिक पद्धतीने एखाद्या विषयाचे अध्ययन करायचे असल्यास प्रथम त्या विषयासंबंधी पूर्व ज्ञान असावे लागते. यापूर्वी ज्ञानाच्या आधारे संशोधक सामान्य अनुमान काढतो. या अनुमानास गृहितकृत्ये म्हणतात.

1. वाशीम जिल्ह्यातील महिला स्वयं सहाय्यता बचत गटात वाढ होत आहे.

2. वाशीम जिल्ह्यातील महिला स्वयं सहाय्यता बचत गटामुळे महिलांना स्वयं रोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत.

3. वाशीम जिल्ह्यातील महिला स्वयं सहाय्यता बचत गटात काम करणाऱ्या महिलांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे.

4. वाशीम जिल्ह्यातील महिला स्वयं सहाय्यता बचत गटामुळे महिलाच्या वैयक्तिक राहणीमान व सामाजिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology) :

प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषणात्मक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच सांख्यिकीय पद्धतीचा संकलित केलेल्या माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी वापर करण्यात येणार आहे.

नमुना निवड (Sample Selection) :

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवडीच्या प्रकारात गैर संभाव्यता नमुना निवड अंतर्गत सहहेतूक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. वाशीम जिल्ह्यातील मालेगाव, मंगळूपीर, कारंजा, मानोरा, वाशिम व रिसोड या सहा तालुक्यातून प्रत्येकी 10 महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची नमुना म्हणून निवड करणार आहे. गावे व लोकसंख्या बचत गटाच्या कार्याचा आधार लक्षात घेऊन 1000 लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावाची निवड करण्यात येणार आहे. ज्या बचत गटाचे कार्य आज सुरळीतरित्या चालू आहे अशा गावातील महिला बचत गटाचा अभ्यास केला जाणार आहे. ही निवड साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीने प्रत्येक बचत गटातील दोन उत्तरदात्यांची नमुना निवडीत निवड केली जाणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection) :

कोणत्याही संशोधनाची सुरूवात ही तथ्य संकलनापासुन होते. संशोधन हे वस्तुनिष्ठ तथ्य संकलनावर अवलंबून असते. तथाच्या आधारावर निष्कर्ष मांडले जातात. म्हणून संशोधन कार्यात तथ्य संकलन ही महत्वाची पायरी आहे. प्रस्तुत संशोधन तथ्ये संकलित करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम या दोन्ही स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोत (Primary sources) :

प्रस्तुत संशोधनात वाशीम जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात स्वयं सहाय्यता बचत गटाची भूमिका हा विषय असल्यामुळे प्रतयक्ष अभ्यास महत्वाचा आहे. त्यामुळे तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून मुलाखत, अनुसूची, तंत्राचा वापर करण्याचे ठरवले आहे.

दुय्यम स्त्रोत (Secondary sources) :

प्रस्तुत संशोधनात द्वितीय स्त्रोता अंतर्गत अध्ययन विषयाशी संबंधित असणारे सरकारी पत्रिका, प्रकाशित अप्रकाशित संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके व महिला आर्थिक विकास महामंडळ वाशीम यांच्याकडील उपलब्ध असलेल्या छापील स्वरूपातीतल माहिती, शासकीय व निमशासकीय माहिती, प्रकाशित व अप्रकाशित दस्ताऐवज, पीएच.डी., एम.फिल, शोधप्रबंध, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट इत्यादी बाबीचा तथ्य संकलन करण्यासाठी उपयोग करण्यात येईल.

तथ्य विश्लेषण (Analysis of data)

संशोधक वेगवेगळया तथ्यांच्या आधारे तथ्य संकलन करतो. अशा विश्लेषणाच्या आधारे गुणात्मक, तथ्याचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्यात रूपांतर केले जाते व विश्लेषणानंतर निष्कर्ष काढले जातात.

प्रस्तुत संशोधनात तथ्याचे संकलन करण्यासाठी तथ्याच्या गुणधर्मानुसार विभाजन करण्यात येईल. अशा विश्लेषणाशिवाय तथ्याला अर्थपूर्णता प्राप्त होणार नाही. म्हणून प्रस्तुत संशोधनात आशय विश्लेषणाचा उपयोग केला जाईल.

संशोधनाची व्याप्ती (Reserach of limitation) :

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे वाशिम जिल्ह्यापूरतेच मर्यादित आहे. या जिल्हयातील महिलांच्या आर्थीक व सामाजिक विकासात स्वयं सहाय्यता बचत गटांची भूमीका बजावली याचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी 1 एप्रिल 2010 ते 31 मार्च 2020 असा 10 वर्षाचा कालावधी निवडण्यात आला आहे. सदर अभ्यासातून निघालेले निष्कर्ष हे केवळ वाशिम जिल्हास लागू असतील.

अभ्यास क्षेत्र (Reserach area) :

प्रस्तुत संशोधन प्रबंधासाठी वाशीम जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील विदर्भ विभागातील वाशीम जिल्हा आहे. या जिल्ह्यात वाशीम, रिसोड, मालेगांव, मंगळूपीर, कारंजा, मानोरा या सहा तालुक्याचा समावेश होतो. जिल्ह्याचे क्षेत्रफळ 5150 चौ. की. मी. आहे. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 1,197,160 इतकी आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील 1000 किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावातील भिन्न-भिन्न व्यवसाय करणाऱ्या महिला बचत गटापैकी एकूण प्रत्यके तालुक्यातील 10 असे एकूण 60 महिला स्वयं सहाय्यता बचत गटाची निवड अभ्यासाचे क्षेत्र म्हणून करणार आहे.

संशोधनाची मर्यादा (Period of the research) :

प्रस्तुत संशोधनात वाशीम जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात महिला स्वयं सहाय्यता बचत गटाची भूमिका यांचा अभ्यास करण्यात येणार असून प्रस्तुत

संशोधन हे वाशीम जिल्हा तसेच 1 एप्रिल 2010 ते 31 मार्च 2020 या दहा वर्षाच्या कालावधीपुरते मर्यादित आहे.

संशोधन साहित्याचा आढावा (Review of literrature) :

मागील साहित्याचा आढावा पद्धतशीर संशोधनासाठील फार मोलाचा ठरतो. मागील संशोधनानुसार संशोधकाच्या संशोधनाला दिशा मिळते. पूर्वी कशा पद्धतीने समस्या हाताळल्या, तिचे स्वरूप कसे होते, समारोप काय झाला, निष्कर्ष काय निघाले हे कळते. पूर्वीचे संशोधन हे विविध परिस्थितीत केलेले असते तरीही त ज्ञान प्रकल्य पद्धती व संशोधन विश्लेषणासाठी आवश्यक ठरते.

द्वारकानाथ (2002) :

द्वाराकानाथ यांनी आपल्या शोध निबंधात आंध्र प्रदेशातील रंगारेड्डी जिल्ह्यातील महिला बचत गट व ग्रामीण कर्जपुरवठा याबाबत अभ्यास केला या अभ्यासात सुवर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजने अंतर्गत स्थापन झालेल्या बचत गटाच्या अभ्यास करण्यात आला. त्यांना अभ्यासत असे दिसून आले की, बचगट चळवळीमळे ग्रामीण महिलांमध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय जाणीवा वाढीस लागल्या.

वावळे व्ही. नी. (2006):

यांनी AN EVALUATORY STUDY OF SELF – HELP WOMENS THRIFT GROUPS INS PARBHANI DISTRICT या विषयावर अभ्यास केला. या अभ्यासानुसार स्वंय सहाय्यता गटांच्या माध्यमातून सुरू केलेल्या व्यवसामुळे 49% सभासदाचे दारिद्र्यनिर्मूलन झाले असल्याचे निदर्शनास आले. त्याशिवाय अभ्यास क्षेत्रातील महिला ह्या त्यांच्या आरोग्यची काळजी घेत असल्याचे दिसून आले.

मुलानी एम यु (2007) :

यांनी 'THE ROLE OF SELF-HELF GROUP IN THE SOCIO-ECONOMIC EMPOWERMENT OF WOMEN WITH REFERENCE TO INDAPUR AND BARAMATI TALUKAS OF PUNE DISTRICT' या विषयावर अभ्यास केला. त्यांना प्रस्तुत अभ्यास अंती अभ्यास क्षेत्रातील महिलांच्या विकासात स्वयं सहाय्यता गटाची भूमिका महत्वाची असल्याचे व महिला स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सामाजिक सक्षमीकरण झाले असल्याचे आढळून आले.

डबली एस. डी. (2010):

यांनी SOCIAL-ECONOMIC EVALUATION OF WOMEN SELF-HELF GEOUPS IN NORTHERN KARNATAKA" या विषयावर अभ्यास केला सदर अभ्यासाची उद्दिष्टे म्हणून कर्नाटकातील, स्वंय सहाय्यता गटाच वाढीची रचना, गटांची निर्मिती, कार्यक्षमा व कार्य पद्धतीच्या अभ्यास करणे, गटाचे गट सभासदावर झालेल्या परिणामांचे परिक्षपण करणे, स्वंय सहाय्यता गटासाठी कार्यरत असणाऱ्या विविध शासकीय योजनाचा आढावा घेणे अशी निश्चित केली होती.

इंगोले पद्मावती एस. (2011) :

यांनी महिला स्वंय सहाय्यता बचत गटांची स्त्री सक्षमी करणारी भूमिका – पुणे जिल्ह्यांचा सुक्ष्म अभ्यास या विषयावर संशोधन केले या अभ्यासात स्वंय सहाय्यता बचत गटाच्या पोय्षक वाढीसाठी गटाच्या संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीकडे लक्ष देण्याची शिफारशी केली आहे. तसेच महिला सबलीकरणासाठी बचत गटांवर कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित करावति असेही या अभ्यासात म्हटले आहे.

प्रकरणाची रूपरेषा : (Chapter scheme)

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : वाशीम जिल्ह्यांचे आर्थिक सामाजिक समालोचन

प्रकारण चौथे : महिला स्वंय सहाय्यता बचत गटातील महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती

प्ररण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसूची : (References)

1. आगलावे प्रदिप, 'सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2010, पृ. क्र. 192.
2. इंगोले पद्मावती एस., 'स्वयं सहाय्यता बचत गटांची स्त्री सक्षमीकरणातील भूमिका-पुणे, जिल्ह्याचा सूक्ष्म अभ्यास', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, फेब्रुवारी 2011.
3. ठाकरे मजुंषा, 'भारतातील स्वयं सहाय्यता गट : व्याप्ती आणि कार्यपद्धती', अर्थबोध, नोव्हेंबर 2006, पृ. क्र. 110-112.
4. डेरे सुरेश, 'गटाच्या महिलांचे आर्थिक व सामाजिक स्थित्यंतर', यशमंथन (यशदा), एप्रिल-जून 2006, पृ. क्र. 10-13.
5. देशपांडे मेधा, 'भारतातील स्वयं सहाय्यता गट', पार्श्वभूमी आणि वाटचाल', अर्थ संवाद, जानेवारी-मार्च 2006, पृष्ठ क्र. 370-373.
6. बाळ सराफ कुसुम, 'स्वयं सहाय्यता बचत गट व त्यात शासकीय यंत्रणाची भूमिका', यशमंथन, एप्रिल-जून 2006, पृ. क्र. 16-18.
7. DABALI S.D., 'SOCIAL-ECONOMIC EVALUATION OF WOMEN SELF HELP GROUPS IN NORTHERN KARNATAKA, PH.D., THESIS, UNIVERSITY OF AGRICULTURAL SCIENCES, DHARWAD, JUNE, 2010.
8. MADHESWARAN S. AND DHARMADHIKARI A. 'EMPOWERING RURAL WOMEN THROUGH SELF-HELP GROUPS : LESSON FROM MAHARASHTRA RURAL CREDIT PROJECT; INDIAN JOURNAL OF AGRICULTURAL ECONOMIC, VOL. 56, NO. 3, JULY-SEPTEMBER 2001, PP. 427-443.

9. MULANI M.U., 'THE ROLE OF SELF-HELP GROUP IN THE SOCIO-ECONOMIC EMPOWERMENT OF WOMEN WITH REFERENCE TO INDAPUR AND BARAMATI TALUKAS OF PUNE, DISTRICT', PH.D. THESIS, TILAK MAHARASHTRA UNIVERSITY, PUNE, MARCH 2007.

10. SHYLENDRA H.S., 'ROLE OF SELF-HELF GROUP', YOJANA, VOL. 52, JANUARY 2008, PP. 25-28.

11. WAWALE VIJAY KUMAR G., 'AN EVALUATORY STUDY OF SELF-HELP WOMEN'S THRIFT GROUPS IN PARBHANI DISTRICT', PH.D. THESIS, S.R.T.M. UNIVERSITY, NANDED, NOVEMBER, 2006.

संकेतस्थळे : (Website)

1. HTTPS://SHGSEWEB.GOV.IN

2. HTTPS://HRLM.GOV.IN

संशोधक | **मार्गदर्शक**

ओमप्रकाश शिवाजीराव जाधव

डॉ. पाटील पी. आर.
संशोधन मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,
श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय, बसमत,
जि. हिंगोली.